News of RUSA activities published in News papers



८ प्रजावाणी — शुक्रवार, दि. ३ फेब्रुवारी २०१७

# 'प्रयोगशाळेतील उपकरणे दुरुस्ती व देखभाल' विषयावर विद्यापीठात पाच दिवसीय कार्यशाळा

नांदेड,दि.२ :-राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान (रुसा) अंतर्गत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि मुंबई येथील वेस्टर्न रिजनल इंस्ट्रुमेंटेशन सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने 'प्रयोगशाळेतील उपकरणे दुरुस्ती व देखभाल' या विषयावर दि.६ ते १० फेब्रुवारी या दरम्यान विद्यापीठात पाच दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रयोगशाळेतील नवनवीन उपकरणे दुरुस्ती व त्यांची हाताळणी कशी करावी, याचे कौशल्य व देखभाल ही आजच्या संशोधनातील महत्त्वाची गरज आहे. ही निकड लक्षात घेऊन विज्ञान तंत्रज्ञान विषयातील प्राध्यापक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ आणि संशोधक विद्यार्थ्यांसाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेमध्ये प्रयोगशाळेत नेहमी लागणारी उपकरणे दुरुस्त करण्याचे प्रशिक्षण प्रात्यक्षिकांसह दिले जाणार आहे.

कार्यशाळेत भाग घेणाऱ्यांनी त्यांच्या प्रयोगशाळेतील नादुरुस्त उपकरणे घेऊन यावीत ती विनामूल्य दुरुस्त करून देण्यात येतील. पाच दिवस चालणाऱ्या या कार्यशाळेमध्ये मुंबई येथील वेस्टर्न रिजनल इंस्ट्रुमेंटेशन सेंटरचे संचालक डॉ.बी.एल.जाधव, जी.डी.पाटील, के.के.महाजन, एन.एन.राव, गोविंद चित्ते, सुधीरकुमार, एम.बी.सिद्रूक, देवेंद्र गुंडे, अस्मिता नेवासकर आणि सरिता थोपटे आदी मान्यवर मार्गदर्शन व प्रशिक्षण देणार आहेत. कार्यशाळेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या प्राध्यापक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ आणि संशोधक विद्यार्थ्यांनी सविस्तर माहितीसाठी विद्यापीठ संकेतस्थळाला भेट द्यावी. तसेच विद्यापीठ रुसा प्रकल्पाचे संचालक डॉ.सी.एन.खोब्रागडे, डॉ.ओ. एस.येमूल आणि रुसा सेंटरचे समन्वयक डॉ.एस.जे. वढेर यांच्याकडे नाव नोंदणी करावी, असे आवाहन डॉ. दीपक पानसकर यांनी केले आहे.

# विद्यापीठामध्ये प्रयोगशाळेत उपकरणे दुरुस्ती कार्यशाळा

**नांदेड, ता. १२ (बातमीदार)** : राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान (रुसा) अंतर्गत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि मुंबई येथील वेस्टर्न रिजनल इंस्ट्रुमेंटेशन सेंटर यांच्या वतीने विद्यापीठाच्या रुसा सेंटर फॉर हर्बो मेडिसिनल स्टडीज येथे 'प्रयोगशाळेतील उपकरणे दुरुस्ती व देखभाल' विषयावर पाच दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. उद्घाटन महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक डॉ. दीपक पानसकर यांच्या हस्ते झाले. या वेळी कुलसचिव बी. बी. पाटील, परीक्षा नियंत्रक डॉ. रवी सरोदे, मुंबई येथील वेस्टर्न रिजनल इंस्ट्रुमेंटेशन सेंटरचे ... के. महाजन, एन. एन. राव, कार्यशाळेचे समन्वयक डॉ. सी. एन. खोब्रागडे, डॉ. एस. जे. वढेर उपस्थित ... ता. सहा ते १० फेब्रुवारीदरम्यान ...ल्या पाच दिवसीय कार्यशाळेमध्ये ...शाळेतील नवनवीन उपकरणे ...ी व त्यांची हाताळणी, कौशल्य व देखभाल ही आजच्या संशोधनातील महत्त्वाची गरज आहे. विज्ञान तंत्रज्ञान विषयातील प्राध्यापक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ आणि संशोधक विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत सहभाग नोंदविला. कार्यशाळेमध्ये विद्यापीठ परिसरातील विविध संकुलातील तसेच कार्यक्षेत्रातील महाविद्यालयातील २०० उपकरणांची दुरुस्ती करून त्याचे प्रशिक्षण सहभागी प्राध्यापक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ आणि संशोधक विद्यार्थ्यांना देण्यात आले. समारोप शुक्रवारी (ता. १०) महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक डॉ. दीपक पानसकर यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

मुंबई येथील वेस्टर्न रिजनल इंस्ट्रुमेंटेशन सेंटरचे संचालक डॉ. बी. एल. जाधव यांनी वेस्टर्न रिजनल इंस्ट्रुमेंटेशन सेंटरची सविस्तर माहिती उपस्थितांना देऊन भविष्यात विद्यापीठास वेळोवेळी मदत करू अशी ग्वाही दिली. या वेळी वित्त व लेखाधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, समन्वयक डॉ. सी. एन. खोब्रागडे, डॉ. एस. जे. वढेर उपस्थित होते. प्रा. एस. एस. पटवेकर यांनी सूत्रसंचालन केले. यशस्वितेसाठी डॉ. एस. आर. बुटले, प्रा. राजकुमार मुन, डॉ. काशिनाथ भोगले, डॉ. चैतन्या, डॉ. टी. एम. कल्याणकर, प्रा. प्रसाद जामखंडे, डॉ. एस. एस. पेकमवार, प्रा. शिवराज शिवपुजे, डॉ. पिंजारी यांच्यासह संकुलातील शिक्षक, कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



नांदेड : राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान (रुसा) अंतर्गत विद्यापीठात 'प्रयोगशाळेतील उपकरणे दुरुस्ती व देखभाल' कार्यशाळा घेण्यात आली.

सकाळ
नांदेड, सोमवार
१३ फेब्रुवारी २०१७
७

# पेटेंट पर कार्यशाला 24 को

**नांदेड़ :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाड़ा विश्वविद्यालय की ओर से 24 अगस्त को विवि के अधिसभा सभागृह में शिक्षक व संशोधक विद्यार्थियों के लिए 'पेटेंट' विषय पर एक दिवसीय कार्यशाला का आयोजन किया जाएगा. यह जानकारी बीसीयूडी के डॉ दीपक पानसकर ने दी.

लोकमत समाचार 3

औरंगाबाद, रविवार 21 अगस्त 2016

# 'पेटंट'वर आज कार्यशाळा

नांदेड/प्रतिनिधी

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) मुंबई आणि राजीव गांधी नॅशनल इन्स्टिट्यूट इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी मॅनेजमेंट, नागपूरच्या वतीने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहामध्ये २४ रोजी सकाळी १० वाजता पेटंटवर कार्यशाळा होणार आहे. या कार्यशाळेत मार्गदर्शक मुंबई येथील रुसाच्या जया गोयल, डॉ.सुहास कुलकर्णी, नागपूर येथील पेटंटचे सहाय्यक निमंत्रक डॉ.अजय ठाकूर हे मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेचे उदघाटन विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.पंडित विद्यासागर यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ.दीपक पानसकर, डॉ.एस.जे.वढेर यांनी केले आहे.

पुण्य नगरी
बुधवार, २४ ऑगस्ट २०१६ | नांदेड

# 'रुसा'च्या वतीने बौद्धिक संपदेवर कार्यशाळा

नवीन नांदेड, ता. २६ (बातमीदार) : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये रुसाच्या (राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान) वतीने बौद्धिक संपदा या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली.

कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर, प्र-कुलगुरू डॉ. गणेशचंद्र शिंदे, मुंबई येथील रुसाच्या वरिष्ठ सल्लागार जया गोयल, सहायक नियंत्रक डॉ. सुहास कुलकर्णी, डॉ. अजय ठाकूर, कुलसचिव बी. बी. पाटील, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक डॉ. दीपक पानसकर, वित्त व लेखाधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, डॉ. शैलेश वढेर यांची उपस्थिती होती.

भारत हा शास्त्रज्ञ आणि अभियंत्यांच्या बाबतीत जागतिक क्रमवारीत ५३ व्या क्रमांकावर असूनही प्रकाशन आणि पेटंट बाबतीत खूप मागे आहे. काही विद्यापीठ वगळता पेटंट फक्त प्रयोगशाळेतीलच संशोधनाला घेता येते असा गैरसमज आहे. भारतीय विद्यापीठ अप्लाईड आणि व्यापारिक दृष्ट्या लागू होणाऱ्या संशोधनात मागे पडत आहेत. बहुतेक विद्यापीठातील संशोधक विद्यार्थी पेटंट करण्यासाठी आवश्यक माहितीबद्दल जागरूक नाहीत. संशोधकांना जागरूक करण्यासाठी बौद्धिक संपदेचे हक्क आणि मार्गदर्शन तत्त्वाबद्दल माहितीची सुधारणा करण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. पेटंटसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया आणि पद्धती, साधने, संकेतस्थळे आदींबद्दलची सविस्तर माहिती देण्यात आली. संशोधनाला योग्य तो वाव मिळावा. संशोधनाचा समाजाला उपयोग व्हावा म्हणून विद्यापीठ अनुदान आयोगाने रुसाद्वारे सर्वोत्तपरी मदत करण्याचे काम हाती घेतले आहे. कोणत्याही शाखेतील केलेल्या संशोधनाला औद्योगिक उत्पत्रामध्ये रूपांतरित करून ती वस्तू बाजारात आणून जास्तीत जास्त कशी समाज उपयोगी होईल यासाठी 'रुसा' नेहमी प्रयत्नशील असणार आहे. यामुळे नवनवीन संशोधकाला त्यांच्या संशोधनाला आणि बौद्धिक संपदेला निश्चितच मोठा वाव मिळणार आहे. संलग्न महाविद्यालय आणि विद्यापीठ संकुलातील तीनशे प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला.



**नवीन नांदेड : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये रुसाच्या वतीने बौद्धिक संपदा या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. या वेळी जया गोयल यांनी मार्गदर्शन केले.**

नांदेड, शनिवार, २७ ऑगस्ट २०१६/२
सकाळ

## 'स्वारातीम' विद्यापीठात उद्या राष्ट्रीय परिसंवाद

नांदेड, दि. २१ : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने 'रीसेन्ट एडव्हान्सेस इन स्टॅण्डडार्यझेशन ऑफ हर्बल ड्रग्स' या विषयावर राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, दि. २३ ऑगस्ट रोजी विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहामध्ये संपन्न होणाऱ्या या परिसंवादाचे उदघाटन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांच्या हस्ते पार पडणार असून यावेळी हर्बल मेडीसिन क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शास्त्रज्ञ डॉ.बी.व्ही. घुले यांचे विशेष मार्गदर्शन लाभणार आहे, असे परिसंवादाचे संयोजक डॉ.सी.एन. खोब्रागडे आणि डॉ.एस.जे. वाढेर यांनी कळविले आहे.

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, मुंबई यांच्या तर्फे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठास विशेष संशोधन कार्यासाठी रुसा सेंटर फॉर हर्बो मेडीसिनल स्टडी हे अत्याधुनिक पृथ:करण उपकरणे असलेले सुविधा केंद्र नवीन इमारतीत कार्यान्वीत करण्यात आले असून केंद्रामार्फत संशोधनपुरक अनेक उपक्रम राबविले जात आहेत. या वेगवेगळ्या उपक्रमांतर्गतच या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले असून यावेळी प्र-कुलगुरु डॉ. गणेशचंद्र शिंदे, प्रभारी कुलसचिव डॉ.आर.एम. मुलानी, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. रवि सरोदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या परिसंवादाच्या यशस्वीतेसाठी संयोजकासह डॉ. एस. आर. बुटले, डॉ. ओ. एस. येमूल आणि एस. एम. पटवेकर परिश्रम घेत आहेत. या परिसंवादाचा जास्तीत जास्त प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

## विद्यापीठात २३ रोजी राष्ट्रीय परिसंवाद

लोकमत न्यूज नेटवर्क

नांदेड : स्वारातीम विद्यापीठ आणि राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने रीसेन्ट डव्हान्सेस इन स्टॅण्डडार्यझेशन ऑफ हर्बल ड्रग्स या विषयावर २३ ऑगस्ट रोजी विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहामध्ये राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन केले आहे. परिसंवादाचे उदघाटन कुलगुरु डॉ. पंडित विद्यासागर यांच्या हस्ते होणार असून यावेळी शास्त्रज्ञ डॉ.बी.व्ही. घुले यांचे विशेष मार्गदर्शन लाभणार आहे, असे संयोजक डॉ.सी.एन. खोब्रागडे व डॉ.एस.जे. वाढेर यांनी कळविले आहे.

या परिसंवादाच्या यशस्वीतेसाठी संयोजकासह डॉ. एस. आर. बुटले, डॉ. ओ. एस. येमूल आणि एस. एम. पटवेकर परिश्रम घेत आहेत. या परिसंवादाचा जास्तीत जास्त प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

## हर्बल मेडीसीनमध्ये संशोधनाला महत्त्व-कुलगुरु

नांदेड/प्रतिनिधी

आयुर्वेदीक औषधांचा आपल्या देशात जुना इतिहास आहे. हजारो वर्षांपासून ऋषी, वैद्य यांनी संशोधनाअंती अनेक वनस्पतींचा वापर करुन विविध आजारांवरील प्रभावी औषधांचा शोध लावला आहे. पूर्वी आजारांचे निदान याच औषधांचा वापर करुन केले जात असे. आजही सत्तर टक्के उपचार हर्बल मेडिसीनद्वारेच होत असतात. त्यामुळे आपल्याकडे हर्बल मेडिसीनमध्ये संशोधनाला महत्वाचे स्थान आहे, असे प्रतिपादन कुलगुरु डॉ. पंडित विद्यासागर यांनी व्यक्त केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहामध्ये २३ ऑगस्ट रोजी 'रीसेन्ट अॅडव्हान्सेस इन स्टॅण्डडार्यझेशन ऑफ हर्बल ड्रग्स' या विषयावरील राष्ट्रीय परिसंवादाच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ.आर.एम. मुलानी, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. रवि सरोदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, हर्बल मेडिसीन क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शास्त्रज्ञ डॉ.बी.व्ही. घुले, डॉ. अतिष साळुंके, डॉ. प्रशांत दळवी, डॉ. प्रज्ञा देशपांडे, डॉ. अमोल शिरफुले, संयोजक डॉ.सी.एन. खोब्रागडे, डॉ.एस.जे. वाढेर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना डॉ. विद्यासागर म्हणाले, बनावट घटकांमुळे हर्बल मेडीसीनची पत खालावत आहे. त्यामुळे ही औषधी आजारांवर फारसा परिणाम करत नाहीत. औषध निर्मितीत दर्जेदार घटकांचा वापर केल्यास त्याची परिणामकारकता चांगली दिसनू येते. विद्यार्थ्यांना या क्षेत्रात चांगला वाव आहे. चांगल्या प्रतिचे संशोधन करुन दर्जेदार औषध निर्मिती करावी असे आवाहन त्यांनी केले. उद्घाटकीय सत्रानंतर डॉ.बी.व्ही. घुले, उद्योजक अतिष साळूंके, डॉ. प्रशांत दळवी, डॉ. प्रज्ञा देशपांडे, डॉ. अमोल शिरफुले आदींनी संशोधनातील प्रवाह व परिणामकारकता यावर सखोल मार्गदर्शन केले. यांनी आर्गन डोनेशन तर डॉ. अमोल शिर×फुले यांनी ड्रग डिस्कव्हरी मेथड्स यावर सविस्तर पणे उपस्थितांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन सोनिया रंधवा तर प्रा. शैलेश पटवेकर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. एस.जी. गट्टाणी, डॉ. एस. आर. बुटले, डॉ. राजेश्वर क्षीरसागर, डॉ. संजय पेकमवार, डॉ. राहुल पिंजारी, डॉ.अजय क्षीरसागर यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुण्यनगरी

गुरूवार, २४ ऑगस्ट २०१७ । नांदेड

3

सकाळ
नांदेड, गुरुवार
२४ ऑगस्ट २०१७
३

# हर्बल मेडिसीनमध्ये संशोधन महत्त्वाचे

## डॉ. पंडित विद्यासागर : राष्ट्रीय परिसंवादाचे विद्यापीठात उद्‌घाटन

नवीन नांदेड, ता. २४ (बातमीदार) : भारताला आयुर्वेदिक औषधांचा जुना इतिहास आहे. हजारो वर्षांपासून ऋषीमुनींनी अनेक वनस्पतींद्वारे अनेक आजारांवरील औषधी शोधलेली आहेत. राजे महाराजांवर राजवैद्यद्वारा याच औषधींद्वारे उपचार होत असत. आजही भारतात ७० टक्के उपचार हर्बल मेडिसीनद्वारेच होत असतात. त्यामुळे आपल्याकडे हर्बल मेडिसीनमध्ये संशोधनाला महत्त्वाचे स्थान आहे, असे मत कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांनी व्यक्त केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियानाच्या विद्यमाने आज विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहामध्ये 'रिसेंट ॲडव्हान्सेस इन स्टँडर्डायझेशन ऑफ हर्बल ड्रग्स' या विषयावरील राष्ट्रीय परिसंवादाच्या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते. प्रभारी कुलसचिव डॉ. आर. एम. मुलानी, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. रवी सरोदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, हर्बल मेडिसीन क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शास्त्रज्ञ डॉ. बी. व्ही. पुले, डॉ. अतिष साळुंके, डॉ. प्रशांत दळवी, डॉ. प्रज्ञा देशपांडे, डॉ. अमोल शिरफुले, परिसंवादाचे संयोजक डॉ. सी. एन. खोब्रागडे आणि डॉ. एस. जे. वाढेर यांची उपस्थिती होती.

ते म्हणाले, की हर्बल मेडिसीनमध्ये दिवसेंदिवस नकली घटकांमुळे औषधींची प्रत खालावत आहे. त्यामुळे आजारावर परिणामकारकपणे औषध उपयोगी पडत नाही. अशा अनेक कारणांमुळे हर्बल मेडिसीनवरील विश्वास कमी होत आहे. त्यामुळे चांगल्या प्रतीची औषधी, चांगल्या प्रकारचे घटक वापरून करणे आवश्यक आहे. या क्षेत्रामध्ये चांगल्या प्रतीचे संशोधन करून दर्जेदार औषधांची निर्मिती करावी, असे आवाहनही त्यांनी केले.



नवीन नांदेड : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील परिसंवादात बोलताना डॉ. पंडित विद्यासागर.

उद्‌घाटनानंतर डॉ. पुले यांनी स्टँडर्डायझेशन ऑफ हर्बल ड्रग, उद्योजक अतिष साळुंके यांनी इंडस्ट्री युनिव्हर्सिटी इंटरॲक्शन, डॉ. दळवी यांनी क्लिनिकल ॲप्लिकेशन्स ऑफ हर्बल ड्रग, डॉ. देशपांडे यांनी आर्गन डोनेशन तर डॉ. शिरफुले यांनी ड्रग डिस्कव्हरी मेथड्स याबाबत मार्गदर्शन केले. सोनिया रंधवा यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. शैलेश पाळेकर यांनी आभार मानले. डॉ. एस. जी. गहाणे, डॉ. एस. आर. कुटे, डॉ. राजेश्वर क्षीरसागर, डॉ. संजय नेव्हलकर, डॉ. राहुल पिंजारी, डॉ. अजय प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.